SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
PHONE: EPABX-2690571 (10 lines), 2693643 (9 lines), 2693730 (9 lines)
❑ GRAM: UNISHIVAJI
o FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
दूरध्वनी : (ईपीएबीएक्स) 2690571 (दहा लाईन्स), 2693643 (नऊ लाईन्स), 2693730 (नऊ लाईन्स)
o तार : युनिशिवाजी o फॅक्स : 0091-0231-2691533 व 0091-0231-2692333.
वेबसाईट : (www.shivajiuniversity.com व www.unishivaji.ac.in)
फॅक्स : 0091-0231-2690655

B+
*****
Accredited by NAAC

*Ref. No.*:- शिवाजी वि. / परीक्षकनियुक्ती / 116 — *Date*:- 07/09/2007

प्रति,

1. मा.प्राचार्य,
   सर्व संलग्नीत महाविद्यालये
2. मा.संचालक,
   मान्यताप्राप्त शिक्षण संस्था
3. मा.विभागप्रमुख,
   सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ

**विषयः—** **दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग सेरेब्रल पाल्सीने बाधीत झालेल्या व्यक्ती लिहिण्यास सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेसाठी लेखनिक पुरविणेबाबत.**

**संदर्भः—** **1. या कार्यालयाचे संदर्भ क्र.SU/EXAM/APP/BOE/18129 दि. 17 फेब्रुवारी, 2003 चे परिपत्रक व**
**2. मा.आयुक्त, अपंग कल्याण म.रा.पुणे यांचे पत्र क्र.अकआ / प्र–7 / लेखनिक / सुविधा / 2006–07 / 2951 दि. 20.12.2006 चे परिपत्रक**

महोदय / महोदया,

वरील विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, संदर्भ क्र. 1 नुसार विद्यापीठ अधिकार मंडळाने अपंग, मूक – बधीर विद्यार्थ्यांना परीक्षेच्यावेळी देण्यात येणा–या सवलतीबाबत ठरवून दिलेले नियमांचे परित्रक क्र.18129 दि.17.02.2003 यापूर्वी आपणास पाठविले आहे, त्यासोबत विहित नमुन्यातील अर्जही पाठविलेला आहे. याव्यतीरिक्त मा.आयुक्त, अपंग कल्याण म.रा.पुणे यांच्या दि. 20.12.2006 च्या परिपत्रकातील तत्वे विद्यापीठ अधिकार मंडळाने स्वीकारलेली आहेत. त्यानुसार मा.आयुक्त, अपंग कल्याण यांनी दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग सेरेब्रल पाल्सीने बाधीत झालेल्या व्यक्ती लिहिण्यास सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेसाठी लेखनिक पुरविणेबाबत कळविलेल्या खालील तत्वांचे पालन करावे.

**लेखनिक पॅनेल तयार करणेबाबतः—**

1. प्रत्येक महाविद्यालयाने परीक्षेच्या आवश्यकतेप्रमाणे लेखनिकाची निवड करून महाविद्यालयीन पातळीवर त्यांचे पॅनेल तयार ठेवावे व त्याची माहिती विद्यापीठास द्यावी.
2. लेखनिकाचे पॅनेल हे आवश्यकतेप्रमाणे त्या त्या शाखेनुसार उदा. कला, वाणिज्य, विज्ञान, गणित, अभियांत्रिकी, वैद्यकीय इ. विषयाप्रमाणे करावे व फक्त पात्र आणि सक्षम लेखनिकांचा त्या पॅनेलमध्ये समावेश असावा.

**लेखनिक निवडीबाबत:—**

3. शक्यतो परीक्षार्थी व लेखनिक हे एकाच शाखेचे असावेत.
4. उमेदवाराने स्वत:चा लेखनिक आणला असेल व जर तो लेखनिक आणि उमेदवार एकाच शाखेचे असतील तर तो लेखनिक उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी/ टप्पा कमी असावा. मात्र लेखनिक व उमेदवार भिन्न शाखेचे असल्यास त्यास ही अट लागू राहणार नाही.
5. काही अपवादात्मक परिस्थितीत परीक्षा सुरू होण्याच्या ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार व.पर्यवेक्षक यांना राहतील.
6. वेगवेगळया विषयाच्या पेपरसाठी एकापेक्षा अधिक लेखनिक वापरता येणार नाहीत. मात्र वरील प्रमाणे (काही अपवादात्मक परिस्थितीत परीक्षा सुरू होण्याच्या ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार व.पर्यवेक्षक यांना राहतील) अपवादात्मक परीस्थितीमध्ये बदल करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

**लेखनिकाच्या मान्यता पत्राबाबत:—**

7. लेखनिकाच्या मान्यता पत्रात खालील माहिती/तपशील नमूद करण्यात यावा.
   - अ. परीक्षेसाठी उमेदवारास द्यावयाचा जादा वेळ.
   - ब. लेखनिकाच्या वेगळे/स्वतंत्र बसण्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था.
   - क. प्रत्येक पेपरवर परीक्षेचा दिनांक, विषय याबरोबरच लेखनिकाचे नांव इ. तपशील देण्यात यावा.
   - ड. अपवादात्मक परिस्थितीत लेखनिक बदलणे आवश्यक असल्यास, त्यासाठी परीक्षा घेणारे सक्षम प्राधिकारी यांचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक द्यावा.
8. लेखनिकास अल्पोपहार घ्यावयाचा असल्यास त्याने तो परीक्षेच्या आगोदर किंवा नंतर घ्यावा.
9. **परीक्षेसाठी द्यावयाच्या अतिरिक्त वेळेबाबत :—**
   - अ. लेखी परीक्षा एक तासाची असल्यास त्यासाठी किमान 20 मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात यावा.
   - ब. त्याच प्रमाणे परीक्षेचा कालावधी एक तासापेक्षा अधिक असल्यास अतिरिक्त वेळ देताना प्रत्येक तासाला 20 मिनीटे अतिरिक्त वेळ याप्रमाणे गणना करून विद्यार्थ्यास परीक्षेसाठी वेळ देण्यात यावा.
10. प्रश्नपत्रिकेमधील मूळ प्रश्नांत दृष्य बाबी समाविष्ट असल्यास अथवा उमेदवाराकडून अशा दृष्य बाबींचा अर्थ लावणे किंवा दृष्य बाबींचे सादरीकरण करणे अपेक्षीत असल्यास अशा प्रश्नाचे ऐवजी पर्यायी प्रश्न विद्यापीठाकडून पुरविण्यात येतील. मात्र उमेदवारास उत्तर देण्यासाठी पर्यायी प्रश्नांचे ऐवजी मूळ प्रश्न निवडण्याची मुभा राहील.

11. दृष्टीहीन उमेदवारांना उत्तरपत्रिका लिहीताना ब्रेलचा वापर करण्याची किंवा संगणक अथवा टंकलेखन यंत्र वापरण्याची मुभा राहील. परंतु त्यासाठी महाविद्यालयाने अशा विद्यार्थांचा परीक्षा फॉर्म भरून घेतेवेळी याबाबत उल्लेख करावा. ब्रेल लिपीमधील उत्तरपत्रिकेचे मुल्यांकन हे ब्रेल लिपी जाणणा–या तज्ञ/परीक्षक यांच्याकडून करण्यात येईल. शक्य झाल्यास प्रश्नपत्रिका ब्रेल लिपीमध्ये अथवा डिजिटल टेक्स्ट (Digital Text) मध्ये पुरविण्यात येतील.

महाविद्यालयांनी अपंग विद्यार्थ्यांच्या बाबतीत प्रथम वर्ष परीक्षेच्यावेळी विहीत नमुन्यात अर्ज घेवून त्या विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा होईपर्यंत (पदवी/पदव्युत्तर) त्यास सवलत द्यावी. दृष्टीहीन विद्यार्थ्यांबाबतीत ब्रेल लिपीचा वापर किंवा संगणक, टंकलेखन यंत्र उपलब्ध करून घ्यावयाचे असेल तर अशा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव प्रवेशावेळीच महाविद्यालयाने विद्यापीठास सादर करावेत.

कळावे,

आपला विश्वासू,

मा.प्र.परीक्षा नियंत्रक